# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

*दूरध्वनी (०२०) २६०५०६४१*

ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in


जा.क्र.रासनिप्रा/कक्ष क्र.१२/अ,ब,क व ड वर्ग/नि.निधी/पारि.भत्ते/ नोंदवहया/ 1533 /सन २०१५ दि.५/०३/२०१५

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ क ब.

२) महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४, नियम ३,१८,७५,७६ व ७७.

३) प्राधिकरणाचे आदेश क्र. रासनिप्रा/निवडणूक पारिश्रमिक/५८८/२०१४ दि.२९/१०/२०१४.

४) प्राधिकरणाचे आदेश क्र. रासनिप्रा/पारिश्रमिक/भत्ते/७७५/२०१४ दि.१७/११/२०१४.

५) प्राधिकरणाचे आदेश क्र. रासनिप्रा/अ-ब वर्ग/नि.निधी/ पारिश्रमिक भत्ते/१०१५/२०१४ दि.९/१२/२०१४.

## परिपत्रक

**विषय :- 'अ','ब','क' व ड प्रकारच्या संस्थांची निवडणूक निधी - विहित नोंदवहया ठेवणेबाबत.**

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब मधील तरतुदीनुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणावर सोपविलेली असुन उक्त कलमाच्या उपकलम (१) नुसार सहकारी संस्थांच्या समितीच्या सार्वत्रिक निवडणुका, नैमित्तिक पद व समिती सदस्यांच्या पदाधिकारी यांच्या निवडणुका निवडणुक राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने घ्यावयाच्या आहेत आणि,

ज्या अर्थी, सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब नुसार शासन अधिसुचना सीएसएल २०१३/ प्र.क१२४/१५- सी दि.३०/३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण गठीत केले आहे आणि,

वाचावे क्र. ३,४ व ५ चे आदेशान्वये अनुक्रमे ड, क, अ व ब वर्ग प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी होणा-या खर्चासाठी निवडणूक निधी, पारिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात आलेले आहेत. तसेच सदर बाबत आवश्यक कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. सदर आदेशातील अटी व शर्तीनूसार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी , तालूका /प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्राधिकरणाने विहित केलेल्या नोंदवहीत

उपरोक्त सूचना संबंधित जिल्हा/तालूका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी वेळोवेळी संबंधित संस्थांच्या निवडणूक निर्णय अधिका-यांचे निदर्शनास आणून सदरची प्रत त्यांना उपलब्ध करून दयावी.

उपरोक्त सुचनांची सर्व संबंधितांनी कोटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे आदेशावरुन.**

3/2/15

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

सहपत्र :- प्रपत्र १ ते ४

प्रति,
१) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२) तालूका / प्रभाग सहकारी निर्णय अधिकारी (सर्व)

निवडणूक निधी परि. भत्ते

जमाखर्चाच्या नोंदी ठेवणे आवश्यक आहे. तसेच अंदाजित निवडणूक खर्च व अंतिम निवडणूक खर्चाचे विवरणपत्र प्राधिकरणाने विहित केलेल्या विवरण पत्रात तपशिलवार देयकांचे प्रतीसह अभिलेखात जतन करुन ठेवणे बंधनकारक आहे. यापूर्वीच वाचावे क्र. ५ सोबत सदर विवरण पत्राची प्रत संलग्न केलेली आहे. सदरचे अवलोकन करावे.

उपरोक्त बाबींचा विचार करता प्राधिकरणाच्या स्तरावरून जमाखर्चाच्या नोंदी ठेवण्याचे दृष्टीने नोंदवही निर्धारीत करुन देणे आवश्यक असल्याने, तसेच यापूर्विच्या सूचनांनूसार सदरची प्रक्रिया सुकर होण्याच्या दृष्टीने निवडणूक निधी खर्चामधून होणा-या जमाखर्चाबाबत नोंदी ठेवणे व संबंधित कागदपत्रे जतन करणेचे दृष्टीने खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहे. सदर सुचना विचारात घेऊनच जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, तालूका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आपले स्तरावर जमाखर्च नोंदवहया व लेखे ठेवण्याची दक्षता घ्यावी.

**सुचना :-**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, तालूका/ प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी सोबतचे प्रपत्र - १ मध्ये आपले स्तरावर स्वतंत्र रोजकिर्द (Cash Book) ठेवावी. सदर रोजकिर्दमध्ये सर्व संस्थांकडून प्राप्त निवडणूक निधी बाबत जमाखर्च ठेवण्यात यावा. सदरला सहकारी संस्था निवडणूक निधी रोजकिर्द असे नाव देण्यात यावे.

२. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संस्थानिहाय सोबतचे प्रपत्र - २ मध्ये रोजकिर्द (Cash Book) व प्रपत्र - ३ मध्ये बाबवार खतावणी (Genral Ledger) ठेवावी. संबंधित संस्थेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्राधिकरणाने यापुर्विच निर्धारीत केलेल्या कालावधीत वाचावे क्र. ५ सोबतचे विवरण पत्रासह (अंदाजित खर्च तपशिल/ अंतिम खर्च तपशिल) संबंधित संस्थेचा रोजकिर्द व बाबवार खतावणी संबंधित जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, तालूका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-यांकडे आवश्यक कागदपत्रांसह सादर करावी.

३. संबंधित जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, तालूका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी सोबतचे प्रपत्र - ४ मध्ये आपले स्तरावर नोंदवही ठेवावी. सदर नोंदवही संस्था प्रकार निहाय अ, ब, क, व ड करीता स्वतंत्र ठेवावी.

४. प्रपत्र ४ मधील रकाना क्र. १ ते १२ जिल्हा/तालूका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याचे स्तरावर भरण्यात यावेत. उर्वरित सर्व रकाने संबंधित निवडणूक निर्णय अधिका-याने भरावे.

५. प्रपत्र क्र. ४ ची नोंदवही व इतर नोंदवहया आवश्यकतेनूसार छापून घ्याव्यात.

६. सर्व नोंदवहया पान क्रमांक नोंदवून संबंधित अधिका-यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

७. प्रपत्र ३ बाबवार खतावणीमध्ये जमा- खर्चाबाबत प्रत्येक खात्याची नोंद घेऊन सदर खात्यामध्ये दिनांक निहाय जमा- खर्च रक्कम दर्शविण्यात यावी. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होताच संबंधित निवडणूक निर्णय अधिका-याने सर्व खाते बंद करुन खातेनिहाय एकूण रक्कम शेवटी दर्शवावी. सदरची रक्कम खर्चनिहाय वाचावे क्र. ५ चे सहपत्राचे विवरण पत्रामध्ये दर्शविण्यात यावी

प्रपत्र - १

(रा.स.नि.प्रा.चे परिपत्रक क्र. दि. चे सहपत्र)

जिल्हा/ तालूका /प्रभाग निवडणूक निर्णय अधिकारी तथा

.........................................................................

# सहकारी संस्था निवडणूक निधी रोजकिर्द (CASH BOOK)

| जमा बाजू (RECEIPTS) | | | | | | | | खर्च बाजू (PAYMENT) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तारीख | पावती नं. | खाते नं. | जनरल लेजर पान नं. | नाव | तपशिल | रक्कम | | तारीख | पावती नं. | खाते नंबर | जनरल लेजर पान नं. | नाव | तपशिल | रक्कम | |
| | | | | | | रुपये | पैसे | | | | | | | रुपये | पैसे |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |

सही/ शिक्का

जिल्हा/तालुका/प्रभाग

सहकारी निवडणूक अधिकारी

# प्रपत्र - २

(रा.स.नि.प्रा.चे परिपत्रक क्र.            दि.            . चे सहपत्र)

निवडणूक निर्णय अधिकारी तथा

..............................................................................

१) संस्थेचे नाव :-

२) निवडणूक कालावधी सन ...........

३) निवडणूक निर्णय अधिका-याचे नाव व पदनाम :-

४) निवडणूक प्रक्रिया सुरु केल्याचा दिनांक :-

५) निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्याचा दिनांक :-

## रोजकिर्द (CASH BOOK)

| जमा बाजू (RECEIPTS) | | | | | | | | खर्च बाजू (PAYMENT) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तारीख | पावती नं. | खाते नं. | जनरल लेजर पान नं. | नाव | तपशिल | रक्कम | | तारीख | पावती नं. | खाते नंबर | जनरल लेजर पान नं. | नाव | तपशिल | रक्कम | |
| | | | | | | रुपये | पैसे | | | | | | | रुपये | पैसे |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |

सही/ शिक्का

निवडणूक निर्णय अधिकारी

## प्रपत्र - ३

(रा.स.नि.प्रा.चे परिपत्रक क्र. दि. चे सहपत्र)

निवडणूक निर्णय अधिकारी तथा ....................................

**बाबवार खतावणी (GENERAL LEDGER)**

१) संस्थेचे नाव :-

२) निवडणूक कालावधी सन ........... ते ...............

३) निवडणूक निर्णय अधिका-याचे नाव व पदनाम :-

४) निवडणूक प्रक्रिया सुरु केल्याचा दिनांक :-

५) निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्याचा दिनांक :-

पान नं ..................... नाव ..........................................खाते नं ...................... खात्याचे नाव ..............................................

| तारीख् | कीर्द पान नंबर | तपशील | जमा | खर्च | शिल्लक ऊर्फ वाढ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | जमेकडील | खर्चाकडील |
| | | | रक्कम रुपये | रक्कम रुपये | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही/ शिक्का

निवडणूक निर्णय अधिकारी

## प्रपत्र - ४

(रा.स.नि.प्रा.चे परिपत्रक क्र.          दि.          चे सहपत्र)

जिल्हा/ तालूका /प्रभाग निवडणूक निर्णय अधिकारी तथा ..................................

### संस्था निहाय बाबवार जमा खर्च नोंदवही

संस्था प्रकार अ/ ब/ क/ ड

| अ.क्र. | संस्था | | |
|---|---|---|---|
| | संस्थेचे नाव | तालूका | जिल्हा |
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |
| | | | |

| जिल्हा/ तालूका/ प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (१ ते १२) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संस्थेकडून जमा निवडणूक निधी | | निवडणूक निधीमधून केलेला एकूण खर्च | संस्थेला परत केलेला निधी | | संस्थेकडून प्राप्त केलेला जादा निवडणूक निधी | | निवडणूक निर्णय अधिकारी नाव व पदनाम |
| रक्कम | दिनांक | रक्कम | रक्कम | दिनांक | रक्कम | दिनांक | |
| ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | |

## निवडणूक निर्णय अधिकारी (१३ ते २५)

### जमा बाबवार तपशिल (१३ ते २०)

| जिल्हा /तालूका/प्रभाग सह. निवडणूक अधिका-याकडून निवडणूक निर्णय अधिका-यास उपलब्ध झालेला एकूण निवडणूक निधी(जादा मागणीसह) | | नामनिर्देशन अर्ज विक्री प्राप्त रक्कम | उमेदवारांकडून जमा एकूण अनामत ठेव रक्कम | इतर किरकोळ जमा | एकूण जमा (१३+१५+१६+१७) | उमेदवारांना परत केलेली एकूण अनामत ठेव | रकाना क्र.१८ पैकी निव्वळ जमा रक्कम (१८-१९) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रक्कम | दिनांक | | | | | | |
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |

| निवडणूक निर्णय अधिका-याने केलेला एकूण अंतिम खर्च (विवरणपत्राप्रमाणे) | निवडणूक निर्णय अधिका-याकडे शिल्लक राहिलेला निवडणूक निधी (२०-२१) | निवडणूक निर्णय अधिका-याने जिल्हा/तालूका/प्रभाग निवडणूक अधिका-यास परत केलेला निवडणूक निधी | | निवडणूक निर्णय अधिकारी सही | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम | दिनांक | | |
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ |
| | | | | | |
| | | | | | |

सही/ शिक्का
जिल्हा/तालुका/प्रभाग
सहकारी निवडणूक अधिकारी